डॉ. दिपक सूर्यवंशी

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १२ वे, अंक – दुसरा; जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३.
मो. ९९०४००३९९८

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 29 | आंबेडकरी चळवळीत वामनदादा कर्डक यांचे योगदान<br>- प्रा. डॉ. किशोर शेषराव धौर | 126 - 129 |
| 30. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील परिवर्तनवादी विचार<br>- डॉ. नंदकुमार माने | 130 - 132 |
| 31. | महाकवी - वामनदादा कर्डक आणि कार्य<br>- प्रा. डॉ. राहुल यशवंतराव निकम / प्रा.डॉ.मारोती निवृत्ती गायकवाड | 133 - 137 |
| 32. | बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची पेरणी करणारामहाकवी वामनदादा कर्डक<br>- प्रा. डॉ. उत्तम जकोजी सोनकांबळे | 138 - 142 |
| 33. | वर्ग लढ्याची जाणीव देणारे महाकवी वामनदादा<br>- डॉ. समाधान इंगळे | 143 - 146 |
| 34. | वामनदादा कर्डक यांची आंबेडकरी गीते<br>- डॉ. रामलीला सुदामराव पवार | 147 - 152 |
| 35. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या लोकगीतातील सामाजिकता<br>- डॉ. यशवंत सोनुने | 153 - 155 |
| 36. | प्रतिभावंत लोककवी शाहीर वामन (दादा) कर्डक<br>- प्रा. डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी | 156 - 159 |
| 37. | वामनदादा कर्डक - व्यक्ती आणि वाङ्मय<br>- प्रा.डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक | 160 - 162 |
| 38. | महाकवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरवाद<br>- प्रा. डॉ. शिवदास कान्हुजी इंदोरकर | 163 - 168 |
| 39. | लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि वाङ्मयातील काव्याचे स्वरूप<br>- प्रा. सिद्धार्थ इंगोले | 169 – 172 |
| 40. | मूल्यदृष्टीचा कवी : वामनदादा कर्डक<br>- प्रा. संतोष लांडे | 173 - 175 |
| 41. | भीमशाहीर.: वामनदादा कर्डक<br>- ललिता मानसिंग गोपाळ | 176 - 178 |
| 42. | वामनदादा कर्डकांच्या लेखनातील सामाजिकता व मानवता विषयक विचार<br>- राहुल संभाजी पंडित | 179 - 182 |
| 43. | वामनदादा कर्डक यांच्या गीतांमधून झालेले समाजप्रबोधन<br>- प्रा. डॉ. गणपत काशिबा हगळे | 183 - 188 |




Scanned by CamScanner



# प्रतिभावंत लोककवी शाहीर वामन (दादा) कर्डक

- प्रा. डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी
(मराठी विभाग)
शि.म.ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय
कळंब जि. उस्मानाबाद- ४१३ ५०७
मो.९४२०९५८६९९
deepaks2021@gmail.com

मराठी साहित्यात १९६० नंतर ठळकपणे ग्रामीण दलित,स्त्रीवादी ,जनवादी, बालसाहित्य, आदिवासी, भटक्या विमुक्त, मुस्लीम,खिस्ती,जैन आणि आदिवासी असे विविध साहित्य प्रवाह व चळवळी मोठ्याप्रमाणात उदयास आल्या.१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात अनेक स्थित्यंतरे घडून आले ,या अनेक प्रवाहापैकी दलित साहित्य प्रवाहाचा विचार केला तर हा प्रवाह गौतम बुद्ध, महात्मा फुले,राजर्षी शाहू महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतून दलित समाजाला आत्मभान आलेहा प्रचंड मोठा समुदाय खडबडून जागा झाला. लिहिता-वाचता झाला, शिक्षणाच्या प्रवाहात आला आणि माणसाला माणूस म्हणून नाकारलेली व्यवस्था व्यथा वेदना,विद्रोह आणि नकार बातून त्याना नकार त्यांच्या हक्क,कर्तव्य आणि जीवनजाणीव निर्माण झाली.याच साहित्याच्या अनुषंगाने अभ्यासक र.बां.मंचरकर लिहितात,"१९६० नंतरच्या मराठी साहित्याला परिवर्तनाचे नवे धुमारे फुटू लागले .मराठी साहित्याच्या सागर परिवर्तनाच्या असंख्य लाटांनी गदगदुन आणि मोहरून आला इथल्या धर्मिक प्रस्थापितांच्या हजारो वर्ष ओसडीत गाडलेला आवाज गर्जना करीत साहित्याच्या रणभूमीवर रुजू होऊ लागला'.

उद्दिष्टे :-

- वामनदादा कर्डक यांचे आंबेडकरी चळवळीतील आणि साहित्यिक क्षेत्रातील योगदान समजून घेणे
- प्रतिभावंत कलावंत म्हणून समाजाला केलेला उपदेश व भूमिका विचारात घेणे.
- प्रतिभावंत कलावंत वामनदादा कर्डक यांच्या गीतलेखनामागील प्रेरणांचा शोध घेणे.
- वामनदादा कर्डक यांच्या गीतातील जाणीवा व त्यांचा सामाजिक प्रभाव तपासून पाहणे
- वामनदादा कर्डक यांच्या गीतातील मूल्यविचारांचे स्वरूप समजून घेणे

गृहितके:-

- वामनदादा कर्डक यांचे अप्रकाशित गीतांची संख्या जवळपास पाच हजारांच्यावर आहेत
- दैनंदिन कष्ट व संघर्षातून वामनदादा कर्डक यांनी सामाजिक मूल्यविचारांचा संदेश दिला आहे
- आंबेडकरी चळवळीतील समाजप्रबोधनाचे केलेले कार्य म्हणून वाखाणण्याजोगे आहे.



Scanned by CamScanner

- महाराष्ट्राच्या मातीत जन्माला आलेले वामनदादा कर्डक यांचे योगदान अद्वितीय आहे

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अभ्यासपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच प्राथमिक व दुय्यम साधन सामुग्री म्हणून प्रकाशित ग्रंथांचा उपयोग करण्यात आला आहे.

**विषय प्रवेश : –**

शाहीर, लोककवी आणि आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, समाज प्रबोधनकार वामन तबाजी कर्डक यांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ रोजी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील देशवंडी या गावात झाला. घरच्या आर्थिक आणि बेताच्या परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही परंतु त्यांना निसर्गदत्त प्रतिभा ही देणगी रूपाने मिळाली होती. आपल्या लेखणी, अमोघ वाणी आणि संगीत यांच्या सुरेख त्रिवेणी संगमामुळे ते प्रसिद्ध झाले.

**महत्त्वाचे प्रसंग व घटना:-**

वामनदादांचे वेगळेपण म्हणजे हाच्या हातानेच पेटी वाजवीत असत. त्यांच्या सुमारे एकूण दहा हजार (प्रकाशित व अप्रकाशित) गीतरचना असल्याचे सांगितले जाते त्यांचे एकूण चार काव्यसंग्रह प्रकाशित होते गौतम बुद्ध, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हेच वामन दादांचे प्रेरणास्थान होते

घरच्या प्रतिकूल परिस्थिती आणि अकाली मुलीच्या ( मीराच्या ) मृत्यूमुळे ते पोटापाण्याच्या व नोकरीच्या शोधार्थ १९३४ मध्ये मुंबईला आले. हाताला मिळेल ते काम करू लागले. त्यात गिरणी कामगार, कोळशाच्या खाणीत कोळसा उचलणे, चिक्कीच व आईस, फळे विक्री असे कितीतरी उद्योग व्यवसाय केले. कशातही त्यांचे मन लागत नसल्याने अनेक ठिकाणी नोकरी करतांना धरसोड केली. बऱ्याच प्रयत्नाने पुढे त्यांना टाटा ल्युब्रिकंट्सच्या कंपनीत नोकरी मिळाली. एके दिवशी मुंबईला राहत असलेल्या चाळीत एक माणूस पत्र घेऊन दादांकडे येऊन म्हणाला, "मालक एवढे पत्र वाचून टाकता." त्यावेळी तिथे वामनदादांनाच काय पण आजूबाजूच्या कुणालाच पत्र वाचता येत नव्हते. त्यामुळे त्या माणसाच्या मनाची झालेली तळमळ बघून दादांच्या डोळ्यांत पाणी आले त्यावर त्यांनी कसल्याही परिस्थितीत लिहायला वाचायला शिकायचे आणि साक्षर व्हायचे असा निर्धार केला. त्यांचे परिचयाचे अधिकारी श्री देहलवी यांच्याकडून मोडक्या लिपीचे अक्षरओळख करून घेतली. तसेच त्यानंतर दादांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार गाण्यातून समाजापर्यंत पोहोचवायचे असा दृढ निश्चय करून त्यांनी उभा महाराष्ट्र, मध्य प्रदेश व गुजरात आदी भागात जाऊन आपल्या आवाजातून आंबेडकरी विचार सर्वदूर पोहोचवले.

चित्रपट पटकथा लेखक, कथाकार, अभिनेता व्हायची त्यांची खूप इच्छा होती. ते त्यासाठी अनेक ठिकाणी चित्रपट कंपन्यामध्ये गेले. खूप प्रयत्नांनी त्यांना मिनर्व्हा नावाच्या फिल्म कंपनीत एक्स्ट्रा म्हणून कामाची संधी मिळाली ज्यावेळी काम नसेल त्यावेळी ते राणीच्या बागेत तासन्तास बसत. त्याचवेळी त्यांना पहिले हिंदी चित्रपट गीताचे चाल व गीत बसवले. त्यांनी नुकतेच रचलेल्या गीताचे ३ मे १९४३ रोजी चाळीतील लोकांसमोर सादरीकरण केले आणि त्यावेळी त्यांच्यातील लोककवी समाजापुढे आला

माणसा इथे मी तुझे गीत गावे...
असे गीत गावे तुझे हित व्हावे

वामनदादांची पहाडी आवाजातील लोकगीते हजारोंचा जनसमुदाय ऐकताना दिसतो, ही किमया केवळ त्यांच्या आवाजाची नव्हे तर त्यातील आशयाची आहे. दादांची गीते लोकबोलीचा वेध घेणारी आहेत. ते लोकमनाला थेट भिडणारे आहे. वामनदादांची कविता प्रचलित समाजव्यवस्थेला थेट रोकडा सवाल घेऊन येते.

'सांगा आम्हाला बिरला,
बाटा, टाटा कुठे हाय हो,
सांगा धनाचा साठा अन्
आमचा वाटा कुठं आहे हो'

व्यवस्थेला प्रश्न विचारणारी त्यांची कविता बाबासाहेबांचे चरित्र सामान्यांना त्यांची भाषा मात्र कमालीची थेट दिसते, आहेत



Scanned by CamScanner

पायरी न चढणाऱ्या वामनदादांची ही लोकगीत शब्दाची मांडणी सुसंस्कारित स्वरूपाची आहे

चांदण्याची छाया, कापराची काया,
माउलीची माया, होता माझा भीमराया'

लोकगीत हे मराठी साहित्यातील देणं- अक्षर वाङ्मय मानले जाते, तसेच शाहिरी काव्याचा बाज असल्याने त्यांची लोकगीत मराठी कवितेचा उष:काल मानली जातात, समीक्षकांनी गौरविले आहे. यापूर्वीच्या पेशवाईकाळात लोकगीतात कोणत्याच प्रकारचे सामाजिक स्थान नव्हते.स्त्रियांना फक्त चूल आणि मूल एवढाच तिचा दर्जा मानला जात होता युद्धात अनेक दिवस बाहेर काढणाऱ्या सैनिकांसाठी पेशवाईतील शाहिरांनी स्त्रियांच्या शृंगाराचे भडक वर्णन करणाऱ्या लावण्या लिहिल्या. तर सामाजिक चळवळीचा वेध घेऊन शाहीर अमर शेख,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे,शाहीर अमर सावळे आदींचा समावेश होता. त्यातच लोककवी वामन दादा कर्डक यांनीही आपली भूमिका शाहिरीतून मांडली

महाराष्ट्रातील लोककवींना समाजमनाची चिंता होती, लोकगीतांच्या 60 वर्षांच्या कालखंडात परिवर्तनवादी भूमिका लोकगीतांतून प्रकट झाली कामकरी, शेतकरी, मार्क्सवादी, स्त्रीवादी, दलित आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, यामाध्यमातून माणूस आणि माणुसकीचा धर्म जोपासण्यासाठी प्रयत्न झाले. लोकगीतांतून समाजप्रबोधन हा हेतू आहे लोकजीवनातील सामाजिक विषमतेवर प्रहार करण्यात येतो.

तुम्हाला चीड यावी तिची ठिणगी उडावी
भुकेल्या माणसाची भूक जाळीत जावी
कविता हीच आता जगाचे गीत व्हावे

दैनंदिन जीवनात आपल्या रोजच्या शब्दातून, लोकभाषेतून शाहिरी रचना, कवने, लोकगीते याद्वारे लोककवींतेतून जनजागृती केली. गीतांमधील लोकजीवनाच्या प्रतिमा त्याच्या साधनेची साक्ष देतात. माणूस हाच वामनदादांच्या काव्यनिर्मितीचा केंद्रबिंदू होता,हे त्यातून सिद्ध होते. मानवता, दया,क्षमा, बंधुभाव, शील, करुणा आणि मैत्री आदी तत्त्वांवर दादांची लोकगीते आधारित आहेत.आंबेडकरी व दलित चळवळीच्या अनेक लोकगीताबरोबरच दादांनी पर्यावरण, हुंडाबंदी,दारूबंदी, ऊसतोड कामगार, दुष्काळ अशा विविध विषयांवर मोठ्या प्रमाणात लेखन केले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर या प्रचंड शक्तीने समाजतळ ढवळून निघाला. रुढींचा सहारा करून व आत्मतेजाची पखरण करून दलितांसाठी ते दादा म्हणतात,

" तितुके वलुते पेरू
आणि खरकटे उरले खाऊ
काय म्हणुनी जीवन असले
जगशी रे आता ?"

'चल गं हरिणी तुरू तुरू, 'सांगा या वेडीला, माझ्या गुलछडीला' यासारखी गाणी आजही ओठावर ताल धरतात.अशी अनेक चित्रपट गीते आजही लोकप्रिय आहेत तत्कालीन परिस्थितीत मुंबईत . सामाजिक चळवळीचे दिवस होते डॉ.आंबेडकरांच्या सभा होत असतत्या दादा मन लावून ऐकत. यातून स्फूर्ती घेऊन दादा समता सैनिक दलाचे कार्यकर्ते झाले आणि त्यांनी भीमकार्यात स्वत:ला वाहून घेतले.. वामनदादांच्या धारदार व पहाडी आवाजाची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही मुक्तकंठाने प्रशंसा केली. असे हे लोककवी वामनदादा वर्षानुवर्षे आपल्या समाजात त्यांच्या प्रभावी कवित्व आणि प्रतिभेशक्तीमुळे अजरामर आहेत.

**दादांचा गौरव आणि मिळालेले पुरस्कार-**

- वामनदादा कर्डक यांनी समाजपरिवर्तनासाठी आपल्या असंख्य अवीट लोकगीतांनी समाजमनाला भुरळ घातली म्हणूनच समीक्षक वा.म. कुलकर्णी यांनी दादांना 'लोककवी' तर जनतेने त्यांना 'वामनदादा' ही पदवी बहाल केली.
- साहित्य कला, संस्कृती मंडळाचा "उत्कृष्ट कविरत्न" पुरस्कार,
- महाराष्ट्र राज्य शासनाचा 'दलित मित्र पुरस्कार', असे तब्बल २९ पुरस्कार मिळाले.



Scanned by CamScanner

- नाशिक आणि बुलडाणा जिल्ह्यात त्यांना नाणे तुलाने सन्मानित करण्यात आले.
- महाराष्ट्र शासनाच्या नाट्यरंगभूमी परिनिरीक्षण मंडळ आणि महाराष्ट्र शासनाच्या साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ यांचे ते तीन वर्षे सदस्य होते. आंबेडकरी चळवळीच्या प्रचार आणि प्रसारासाठी आपले उभे आयुष्य कार्य केले
- विचारांच्या माध्यमातून सामाजिक कार्य करणाऱ्या प्रतिभावंत, लोककवी वामनदादा कर्डक यांचे १५ मे २००४ रोजी निधन झाले, अशा या महाराष्ट्राच्या प्रतिभावान शाहिरास विनम्र अभिवादन !!

निष्कर्ष :-

वामनदादा कर्डक यांचे विचार चिंतन हे 'सामाजिक बांधिलकी' असून ती समृद्ध होण्यासाठी त्यांचे जीवन संघर्षमय राहिले आहे. दलित कवींच्या कवितेतून आंबेडकरवादी विचारांची प्रकर्षाने जाणीव होते विद्रोहाची आणि वेदनेची कविता म्हणजे आंबेडकरवादी कविता असून त्यात स्वातंत्र्य समता,न्याय,बंधुता,मानवता आणि विश्वशांतीचा संदेश मिळतो. या काव्याचा आत्मा आणि प्रेरणाच डॉ.बाबासाहेब आंबेडकर असून त्यांचे विचार दलित कवितेतून आलेले दिसून येतात. एकूणच आंबेडकरी चळवळीतही वामनदादा कर्डक यांचे विचार वर्तमानकालीन समाजजीवनाचा दस्तऐवज आहे

संदर्भ ग्रंथ:-


1. मंचरकर र.बा. :(संपा.) सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य,पद्मगंधा प्रकाशन, पुणे-२०१२
2. गायकवाड माधवराव, जाधव सागर (संपा.)महाकवी वामनदादा कर्डक समग्र वाङ्मय खंड-२ अलोक संबोधी प्रकाशन, यवतमाळ प्रथमावृत्ती, १५ मे २०१०
3. किरवले कृष्णा, दलित चळवळ आणि साहित्य , प्रतिमा प्रकाशन प्रथमावृत्ती, जून -१९९६
4. सरवदे के. व्ही. 'तुफानातला दिवा'. प्र. आ.-२०११ मुक्तरंग प्रकाशन, लातूर
5. गुंडरे दादाराव 'मराठी कवितेतील महानायकाचे दर्शन', प्र. आ.- ऑगस्ट २०१८ मैत्री प्रकाशन, लातूर
6. पाटील सदाशिव ,सार्थ गोरोबा चरित्र ,गुरुकृपा मुद्रणालय,लातूर
7. डॉ.बेळंबे गणेश मानवमुक्तीची चळवळ ,२०१६


*****



Scanned by CamScanner